# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ०८** **// तहकूब विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक २६/०२/२०१९**

अर्थसंकल्प तयार करणेस्तव सादर केलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करणेकामी दि.२०/०२/२०१९ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता तहकुब करण्यांत आलेली स्थायी समितीची सभा जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२६/०२/२०१९ मंगळवार रोजी दुपारी ४.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवान मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा. श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | कोल्हे प्रविण रामदास |
| ढेकळे सदाशिव गणपत | सनकत चेतन गणेश |
| बेंडाळे उज्वला मोहन | पाटील प्रतिभा सुधिर |
| हाडा शुचिता अतुलसिंह | लड्ढा नितीन बालमुकूंद |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलीप बबनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| खडके सुनिल वामनराव | |

सदर सभेस मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, प्र.नगरसचिव,श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

(वंदेमातरमने सभेला सुरुवात झाली )

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाची सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य श्री.मयुर चंद्रकांत कापसे यांचा रजेचा अर्ज आलेला असून तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव :-** मा.सभापती महोदय यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचा प्रस्ताव दिलेला आहे त्याचे मी वाचन करतो,

पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकीस्तान विरोधात मोठी कारवाई केली. भारतीय वायुसेनेच्या मिराज २००० या लढाऊ विमानाने पहाटे ३ वाजता पाकीस्तानी दहशतवादी तळांवर हल्ला करुन ३०० / ४०० आतंकवादी ठार केले त्याबद्दल भारतीय वायुसेनेचे तसेच सरकारचे त्याबद्दल अभिनंदन आम्ही सर्व जवान तसेच सरकारच्या पाठीशी आहोत..... सर्वांचे अभिनंदन.

**नगरसचिव:- विषय क्र १)** मा.उपायुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/अर्थ/२६०१/२०१९ दि.१६/०२/२०१९ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१८-२०१९ चे सुधारीत सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेत आले असुन त्या अनुषंगाने अर्थ संकल्पास मान्यता देणे.

**श्री.भगतराम बालाणी :-** मा.आयुक्त यांनी आपल्याकडे सन २०१८-२०१९ चे सुधारीत सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर केलेले असून सर्व सन्मा.सदस्य यांनी सदर विषयी अभ्यास केलेला असुन तरी याबाबत ज्या सदस्यांना या अर्थसंकल्पा संदर्भात काही सूचना किंवा सुधारणा सुचवावयाच्या असतील व त्या मनपा हीताच्या असतील तर त्यात बदल करण्यात येईल तरी ज्या सन्मा.सदस्यांना बोलायचे असेल त्यांनी आपल्या सूचना / सुधारणा सुचवाव्यात ही विनंती.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** अर्थ संकल्पीय जमा बाजू - जळगाव शहर महानगरपालीकेला महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री.देवेंन्द्रजी फडणवीस, जल संपदा मंत्री व वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना. गिरीषभाऊ महाजन, जळगाव शहराचे आमदार राजूमामा भोळे यांनी म.सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभीयान योजने अंतर्गत 100 कोटीचे अनूदान मंजूर केलेले आहे. परंतू प्रशासनाने ही रक्कम जमा व खर्चा बाजू ठिकाणी तरतूद केली नाही. तरी जमा व खर्चामधे म.सुवर्ण जयंती नगरोत्थान या लेखाशिर्षाखाली तरतूद करण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.सदाशिव ढेकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सार्वजनीक उदयाने व्यवस्था व दुरुस्तीसाठी प्रशासनाने 1.00 लक्ष रु. ची तरतूद केलेली असून ती अपूर्ण आहे असे वाटते. जळगाव शहरात जुने डॉ.शामाप्रसाद मूखर्जी उदयान, पारीकपार्क उदयान, हेमू कलाणी बगीचा, शिवाजी उदयान असे जूने बगीचे अनेक आहेत. त्यासाठी 5.00 कोटी रु. ची तरतूद करण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.सदाशिव ढेकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** बालगंधर्व खुले नाटयगृहाच्या दुरुस्तीसाठी 0.00 तरतूद अपुर्ण असून ती 50.00 लक्ष इतकी करण्यात यावी.
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.सदाशिव ढेकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** जळगाव शहरातील कार्यरत दवाखाने या ठिकाणी औषध व यंत्र सामुग्रीसाठी प्रशासनाने 35.00 लक्ष तरतूद केलेली आहे. शहरातील दवाखाने अदयावत करणेच्या दृष्टीने व त्या ठिकाणी सुविधा पुरविणे यासाठीची रक्कम ही फारच कमी असून ती 1.00कोटी करण्यात यावी.
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.सदाशिव ढेकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** जळगाव शहरातील सिग्नल व्यवस्था बरीच जुनी झाली आहे. जळगाव शहरातील विस्तार व वाहतूक वाढली आहे. त्यासाठी 1.00 कोटी रु. ची तरतूद करण्यात यावी. प्रशासनाने ही तरतूद 6.60 लक्ष रु. केली आहे.
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.सदाशिव ढेकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** स्मशानभूमी व्यवस्था व दुरुस्तीसाठी केलेली 50 हजार इतकी तरतूद नगण्य असून हा निधी 1.00 कोटी करण्यात यावा.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** रस्ते दुरुस्ती साठी प्रत्येक प्रभाग समीतीसाठी प्रशासनाने 10.00लक्ष रु.ची तरतूद केलेली आहे ती प्रत्येक प्रभाग समीती निहाय 50.00 लक्ष करण्यात यावी.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** गटार व्यवस्था व दुरुस्तीसाठीचा एकत्र निधी प्रशासनाने फक्त 50.00 हजाराची तरतूद केलेली आहे. ती वाढवून 1.00 कोटी करण्यात यावी तसेच प्रत्येक प्रभाग समीतीसाठीची तरतूद 2.00 लक्ष वरुन 5.00 लक्ष करण्यात यावी. बऱ्याच गावठाण भागामध्ये जुन्या गटारींची अवस्था दयनिय असल्याने दुरुस्तीची आवश्यकता आहे.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** संडास / मूतारी व्यवस्था व दुरुस्तीसाठीचा निधी 1.00 लक्ष तरतूद केलेली आहे. बऱ्याच ठिकाणी संडाशीची दुरावस्ता असून ही दुरुस्ती करणेसाठी हा निधी वाढवून 50.00 लक्ष वाढवण्यात यावा.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** इमारत व्यवस्था व दुरुस्ती साठीचा निधी 20.00 लक्ष वरुन 50.00 लक्ष वाढवण्यात यावा.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.भगतराम बालाणी :-** व्यापारी संकूलांसाठी दुरुस्ती साठीचा 1.50 लक्ष इतकी तरतूद केली असून बऱ्याच ठिकाणातील व्यापारी संकुले या ठिकाणी व्यापारी संकुलाच्या टेरेसची दुरुस्ती, रेलींग दुरुस्ती, ड्रेनेजच्या व्यवस्थेसाठी तसेच काही ठिकाणी कॉक्रेटींग करणे इ. व्यवस्था करणेसाठी ही तरतूद 3.00 कोटी करण्यात यावा.
**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.भगतराम बालाणी यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** क्रिडा व्यायाम साहीत्या साठीची तरतूद प्रशासनाने केलेली नाही ती 1.00 कोटी इतकी करण्यात यावी.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.सुनिल खडके :-** क्रिडास्पर्धा/महापौर चषक यासाठीची केलेली तरतूद 30.00 हजार अपूर्ण आहे. यासाठी म.शासनाने सी.एम.चषक व केंद्र व राज्य शासनाच्या खेळासाठी विविध आयोजना साठी योजना आखत असते यासाठी वाव मिळावा तसेच मनपा कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात यावेत. यासाठी 25.00 लक्षची तरतूद करण्यात यावी.
**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**सौ.शुचिता हाडा :-** अंधअपंग कल्याण निधी साठीची तरतूद 2.25 कोटीवरुन वाढवून 3.00 कोटी इतकी करण्यात यावी. तसेच या योजनेची अंमलबजावणी 100 टक्के होणेसाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** सन्मा.सदस्या सौ.शुचिता हाडा यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**सौ.शुचिता हाडा :-** महीला बालकल्याण निधीसाठीची केलेली तरतूद 3.75 कोटीवरुन वाढवून 4.00कोटी इतकी करण्यात यावी या योजनेची अंमलबजावणी 100 टक्के होणेसाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** सन्मा.सदस्या सौ.शुचिता हाडा यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.दिलीप पोकळे :-** जळगाव शहरात नवीन सार्व. संडाशी व मूताऱ्या साठी प्रशासनाने 1.00 कोटी तरतूद केली आहे. जळगाव शहराचा वाढता विस्तार पाहता केलेली तरतूद अपूर्ण आहे यासाठी 3.00 कोटी तरतूद करण्यात यावी.
**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.
**श्री.दिलीप पोकळे :-** नवीन इमारती / फायर स्टेशन बांधणेसाठी 1.50 कोटी तरतूद ठेवण्यात आलेली होती. जळगावशहराचा विस्तार नवीन इमारती / फायर स्टेशन बांधणेसाठी 5.00 कोटी तरतूद करण्यात यावी.
**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** नवीन वाहन व्यवस्था या हेडखाली 75.00 लक्ष रु. निधीची तरतूद केली असून नवीन वाहने खरेदी कामी हा निधी 1.25 कोटी इतका वाढवण्यात यावा.

**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** नवीन स्मशानभूमी साठीचा निधी 50.00 लक्ष वरुन 2.00 कोटी वाढवण्यात यावा.

**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मनपाने खरेदी केलेल्या नवीन वाहनांचा विमा काढावा लागणार असल्याने वाहन विमा खर्चाची रक्कम 23.44 लक्ष वरुन वाढवून 45.00 लक्ष रु.करण्यात यावी.

**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** स्मशानभूमी साठी लाकूड व दफनविधीसाठीचे साहीत्य मोफत पुरवीणेकामी प्रशासनाने तरतूद पन्नास हजार केली आहे. तरी ती 1.00 कोटी रु. तरतूद करण्यात यावी. व याबाबत शासनाकडे जळगावचे मा.आमदार राजुमामा भोळे, मा.महापौर हे याबाबत लेखापरिक्षण विभाग व शासनाकडे मार्गदर्शन मागविणेबाबतचे पत्र दिले आहे. याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे प्रशासनाने शासनाचे मार्गदर्शन घेवून याबाबत अमंलबजावणी करावी.

**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.चेतन सनकत :-** साफसफाई खरेदी करणे कामी प्रशासनाने तरतुद केलेली 25.00 लक्ष कमी आहे. जळगाव शहरामधे कचरा संकलन करणेसाठी डस्टबीन खरेदी करणेकामी व इतर विविध साहीत्य खरेदी करणेकामी तसेच मनपा सफाई कामगारांना लागणारे साहीत्य खरेदी करणेकामी 1.00 कोटी रु. तरतूद करण्यात यावी.

**श्री.सुनिल खडके:-** सन्मा.सदस्य श्री.चेतन सनकत यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** जळगाव शहरातील मनपाच्या मतदार यादीत नावे असलेले सर्व नागरीक यांचा अपघात विमा काढणेसाठी 1.00 कोटी तरतूद करण्यात यावी. प्रशासनाने ही तरतूद 1.00 लक्ष केली आहे.

**श्री.भगत बालाणी :-** सन्मा.सदस्य श्री.सदाशिव ढेकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** जळगाव शहरातील जे मालमत्ताधारक नियमित मालमत्ता कर भरत आहेत व ज्यांना 2 मुली आहेत ज्यांच्या नावाने घरपट्टी लागू आहे अशा घरपट्टी धारकांना घरपट्टी 1 टक्का रिबीट मालमत्ता करातून देण्यात यावा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सन्मा.सदस्या सौ. शुचिता हाडा यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** जळगाव शहरातून मनपा क्षेत्रातील राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर प्रतीनिधीत्व असलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून मदत करण्यासाठी अटीशर्ती ठरवून घेवून 50.00 लक्ष रु. ची तरतूद करण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.सुनिल खडके:-** जळगाव शहर महानगरपालिकेत सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल तसेच बाळासाहेब ठाकरे, अटलबिहारी वाजपेयी, स्वामी विवेकानंद, बाबासाहेब आंबेडकर यांचे जळगाव शहरात महापुरुषांचे पूतळे उभारणेकामी 1.00 कोटी रु. तरतूद करण्यात यावी.

**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य श्री.सुनिल खडके यांनी केलेल्या सुचनेस माझे अनूमोदन आहे.

**श्री.भगत बालाणी :-** अर्थ संकल्पीय तरतुदीसाठी प्रशासनास आमच्या खालील प्रमाणे सुचना आहेत.

1) मालमत्ता कराबाबतचे सर्व्हेक्षण मार्च 2019 अखेर पूर्ण करावे सन 2015 ते 18 ही वसूली कमी असल्याने ती वाढवून 100 टक्के वसुलीसाठी प्रयत्न करावे.

2) खुला भुखंड कर वसुली वाढविणेसाठी प्रयत्न करावे ज्या ठिकाणी खुल्या भुखंडावर बांधकाम परवानगी व भोगवटा नगररचना विभागाने दिलेल्या आहेत हयासंबंधीची माहिती नगररचना विभागाने कर वसुली व खुला भूखंड विभागास लेखी कळवावी. ज्या भुखंडावर यानंतरही अशी खुला भूखंड कराची आकारणी सुरु आहे ती रद्द करुन तात्काळ घरपट्टी कराची आकारणी करणेबाबत प्रभाग समीतीने कार्यवाही करावी.

3) मनपाचे प्रसूतीगृहांची दर्जोन्नती वाढवण्यासाठी प्रयत्न करावे. ज्या मनपाच्या प्रसूतीगृहांमधे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाही त्याबाबत नियुक्ती नव्याने करण्यात यावी. तसेच मनपा मधे अधिकारी वर्ग विशेषता डॉक्टर्स व कर्मचारवर्ग मानधनावर (कंत्राटी तत्वावर ) भरण्यात यावे याबाबत कार्यवाही प्रशासनाने तात्काळ सुरु करावी.

4) नवीन वृक्षगणना जीपीएस द्वारे करणेकामी केलेल्या 50.00 लक्ष तरतूदीची काटेकोर अमंलबजावणी करण्यात यावी.

5) खुला भुखंड कर, मनपाच्या गाळयांची कर वसुली व इतर विविध करांचे कर संकलन व वसुली यापुढे संबंधीत प्रभाग समिती मार्फत वसुल करणेची प्रशासनाने तजवीज करावी.

**श्री.नितीन लढढा :-** उत्पन्नाची बाजु लक्षात घेता १०० % वसुल धरता येणार नाही. मालमत्ता कराची वसुली एप्रिल महिन्यामध्ये १०% सुट असल्यामुळे सरासरी २५ ते ३० टक्के मालमत्ता कराचा भरणा हा एप्रिल महिन्यातच होत असतो. आज तागायत मालमत्ता कराची ५० ते ५५ टक्के वसुली आहे. पुढील एक महिन्यात उर्वरीत ४५ टक्के वसुली अपेक्षित नाही. त्या करीता

प्रशासनाने वसुली संदर्भात योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे. जर १०० टक्के वसुली झाली तरच १०० टक्के निधी वापरता येऊ शकतो. गाळे हस्तांतरण संदर्भात हस्तांतरण फीची तरतुद निश्चित करणे गरजेचे आहे. ठरवुन दिलेली फी ही जास्त असल्याने गाळे धारक आपसात व्यवहार करुन गाळयाचे वापर करुन हस्तांतरण करत नाही. त्यामुळे म.न.पा.चे नुकसान होत आहे. गाळे धारकांकडुन मिळणारे उत्पन्न ३२० कोटी रुपये अपेक्षित आहे. सन २०१८-१९ ला गाळेधारकांना बजावण्यात आलेल्या बिलांची रक्कम २७६ कोटी ही कमी असून ती वाढविण्यात यावी. अर्थ संकल्प सादर करताना आकडयांचा विचारच केलेला दिसत नाही. शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर व समांतर रस्त्यांवर विदयुत पोल उभारणे व शिफ्टींगसाठी ६० कोटी करण्यात यावी.

**मा.सभापती :**- नितीन भाऊ आपण दिलेल्या सुचनेप्रमाणे बदल करायला सांगितले आहे.आपण महासभेत घेतलेला ५ पट दंड ते सर्व व आपण सांगितल्या प्रमाणे बदल करण्यात येईल.

**मा.सभापती :**- उपायुक्त महसुल यांनी मार्केटची मागणी तपासावी व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री.सदाशिवराव ढेकळे :**- बांधकाम परवानगी देताना शोषखड्डे कंम्पलसरी केलेले होते पाणी आडवा पाणी जिरवा योजनेनुसार यांसदर्भात नगररचना विभागाकडून त्याबाबत अंमलबजावणी होत आहे कां ?

**श्री.भगतराम बालाणी :**- जळगांव शहरातील मिळकतींचे सर्वेक्षण करणेसाठी आपण अमरावती येथिल कंपनीस काम दिलेले आहे कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत माझी चर्चा झाली असुन त्यांचे म्हणणे असे आहे की, जळगांव शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण ८५ ते ९० टक्के पुर्ण झालेले आहे ते लवकरच पुर्ण करण्यात यावे असे त्यांना सांगण्यात आले आहे. सभागृहाला मालमत्ता सर्वेक्षणा बाबत माहिती व्हावी याकरिता मी हे बोलत आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :**- खुलाभूखंड कर वसुलीकरिता प्रयत्न करण्यात यावे.

**श्री.रियाज बागवान :**- विष्णूभाऊ यांनी जी सूचना केली आहे ती योग्य आहे तसेच स्मशानभुमीकरिता जशी तरतूद केली आहे तशी कब्रस्थान करिता करण्यात यावी.

**मा.**सभापती :- दुरुस्तीच्या संदर्भात आपण विषय घेतलेला आहे. जिथे ३० लक्ष रुपयांची तरतुद असेल तिथे १ कोटीची तरतुद केलेली आहे व ज्या सोई सुविधा नागरीकांच्या हितासाठी आहे. तेथे आपण वाढ नक्कीच केलेली आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :**- पिंप्राळा घरकुल परिसरात दिक्षाभुमीसाठी तरतूद करण्यात यावी. त्यात दुरुस्तीची तरतूद करण्यात यावी. जागा दयायला पंधरा वर्षे झाली आहेत. दिक्षाभुमीसाठी २ कोटी तरतुद करण्यात यावी.

**श्री.नितीन लड्ढा :**- १०० टक्के निधी खर्च करावा परंतू १०० टक्के वसुल करावा. उत्पन्नांचे बाजुने गाळयांचे हस्तांतरण करणेबाबत निर्णय घेण्यात यावा. ट्रान्सपोर्ट येथिल दुकानांची मुदत संपुन तीस वर्षे झालेली आहेत ती दुकाने त्यांच्या ताब्यात असुन तेअनधिकृत वापर करीत आहेत. गोलाणी मार्केट व न्यु. बि.जे मार्केट यांचे गाळे हस्तांतरण करता येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :**- पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना जळगांव शहरात अविकसीत हरीत क्षेत्रात राबवावी. त्यासाठी बंधारा इत्यादी तयार करण्यासाठी अर्थ संकल्पात तरतुद करण्यात यावी.

**मा.सभापती :**- स्थायी समिती व महासभेची सुचना काढतांना सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारत, २ रा माळा या प्रमाणे सभेच्या स्थळाचा उल्लेख करण्यात यावा.

**श्री.सुनिल खडके :**- पाणी अडवा, पाणी जिरवा साठी २ कोटींची तरतुद करण्यात यावी.

**श्री.विष्णु भंगाळे :**- म.न.पा सभेची विषयपत्रिका काढतांना सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारत, दुसरा माळा सभागृह, या प्रमाणे सभेचे स्थळ नमुद करण्यात यावा. रिंग रोड भागात लावण्यात आलेले एल.ई.डी.लाईटचा उजळ नविपेठ येथील लावण्यात आलेल्या एल.ई.डी.लाईटपेक्षा जास्त का ? आपण त्या कर्मचाऱ्यांना विचारले की ते आम्हाला म्हणतात की त्याचे पेमेंट आम्हाला मिळले नाही म्हणून आम्ही बदलत नाही.

**एस.एस.पाटील :**- एल.ई.डी. विज बचतसाठी आहे. त्यांनी होलसेल मधील एल.ई.डी. आहेत व त्याबाबत कंपनी सर्वे करीत आहे. टेस्टींग करुनच एल.ई.डी. बसविण्यात येतील.

**श्री.नितीन लढढा :**- कराच्या वसुलीत सदस्य जर अडथळा आणत असतील तर सदस्यांनी अडथळा आणू नये.

**श्री.नितीन लढढा :**- नगरसेवककांची मानधनाची तरतुद आहे. पण मानधनाची रक्कम ही मिळत नाही कृपया सर्वांना मानधनाची रक्कम देण्यात यावी.

**श्री.भगतराम बालाणी :**- जो पावेतो नगरसेवकांना मानधन मिळत नाही. तो पावेतो म.आयुक्त यांनी पगार घेवु नये.

**मा.सभापती :**- श्री.विवेक आळवणी क्रिडा अधिकारी यांनी २६ वी अखिल भारतीय सिनियर टेबल टेनिस अजिंक्य पद स्पर्धा २०१८ मध्ये दुहेरी गटात सुवर्ण पदक व महाराष्ट्र संघात रौप्य पदक मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येत आहे.

**(मा.सभापती महोदय यांनी शाल व श्रीफळ देऊन श्री.विवेक आळवणी यांचा सत्कार केला )**

सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९० पारित करण्यात आला.

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.आयुक्त महानगरपालिका जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/अर्थ/२६०१/२०१९ दि.१६/०२/२०१९ अन्वये मा.आयुक्त यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१८-२०१९

चे सुधारीत अंदाजपत्रकासह सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेंत आलेले आहेत. दि.२०/०२/२०१९ रोजी घेण्यात आलेली सभा अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी तहकूब करणेत आली होती. सदर तहकूब सभा दि.२६/०२/२०१९ रोजी दुपारी ०४.०० वाजता घेण्यात आली.

दरम्यानच्या काळात मा.आयुक्त यांनी सादर केलेल्या माहितीचा सखोल अभ्यास केला असता मा.आयुक्त यांनी जमा खर्चाच्या गोषवारा सादर करतांना मुदत संपलेल्या गाळयांची प्रत्यक्षात असलेली मागणी न धरता मागणी कमी प्रमाणात धरलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. परिणामी महसुली उत्पन्न कमी दर्शविलेमुळे खर्च बाजुला तरतुदी त्या अनुषंगाने अल्प प्रमाणात दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्याच्या परिणाम विकास कामावर होणार आहे. यास्तव प्रत्यक्षात कमी प्रमाणात दर्शविण्यात आलेली मागणी रक्कम रुपये- २४१,१४,४०,०००/- इतकी रक्कम वाढविणे आवश्यक असुन त्याप्रमाणे उत्पन्नात मुदत संपलेल्या गाळयांचे उत्पन्नात रक्कम रुपये - २४१,१४,४०,०००/- मागणी वाढविण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत शासनाकडुन १०० कोटी अनुदान प्राप्त होईल त्यामुळे सदर रक्कम जमा बाजूस वाढविण्यात येवुन एकूण रक्कम रुपये ३४१,१४,४०,०००/- जमा बाजुस वाढ करुन सदरची वाढ लक्षात घेता खर्च बाजुला सोबतच्या परिशिष्ठ “अ” मध्ये नमूद केल्या प्रमाणे तरतूद करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे महसुली उत्पन्नात करण्यात आलेली वाढ व त्या अनुषंगाने खर्च बाजुस करण्यात आलेल्या तरतुदीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने वरिल प्रमाणे करण्यात आलेली वाढीव तरतुद लक्षात घेवुन अंदाजपत्रकात योग्य ती सुधारणा करुन सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० अंदाजपत्रक तयार करुन महासभा समोर मान्यतेसाठी यथाशिघ्र सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १४ प्रतिकुल मते :- ००

**सुचक :-** बालाणी भगतराम रावलमल

**अनुमोदक :-** ढेकळे सदाशिवराव गणपत

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**